माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

## क्र. मुमाआ/नों.क्र.१७०७/२३/अ.क्र.५९१०/२५/०१

**श्री. दिगंबर हरीभाऊ कोते**
मु.पो. शिर्डी, पालखी रोड,
साई नागरी बँकेजवळ, ता. राहता,
जि. अहमदनगर – ४२३१०९.

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक**
राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, जुने प्रशासकीय
महाविद्यालय इमारत, रुम नं. १,२,५ व ६ हजारीमल सोमानी मार्ग,
छत्रपती शिवाजी टर्मिनससमोर, मुंबई – ४००००१.

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्रबंधक (विधी)**
राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, जुने प्रशासकीय
महाविद्यालय इमारत, रुम नं. १,२,५ व ६ हजारीमल सोमानी मार्ग,
छत्रपती शिवाजी टर्मिनससमोर, मुंबई – ४००००१.

**<u>व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : १८.०९.२०२५</u>**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपीलीय अधिकारी | : | उपस्थित |

आज सुनावणीच्या वेळी अपीलार्थ दृकश्राव्य माध्यमाद्वारे उपस्थित आहे. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक, राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, श्री. विलास मोरे व विद्यमान प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्रबंधक (विधी), राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग उपस्थित आहेत.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, अपीलार्थी यांनी दाखल केलेल्या जोडपत्र-अ नुसार "दि. १२.१०.२०२१ रोजीच्या निकाल प्रती मिळण्याबाबत रु. ५०/- रुपये मनी ऑर्डर केलेली आहे. सदर रक्कम आपल्या कार्यालयात जमा असून ती कोणत्या खात्यात जमा केली याबाबत सदर खातेचे नाव व नंबर प्रतीच्या छायांकित प्रत मिळावी" याबाबत माहितीची मागणी केली आहे. त्यावर तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी दि. २५.०७.२०२२ रोजी "सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यांत येते की, आपला दिनांक १२.१०.२०२१ रोजीची निकाल प्रत मिळणेबाबतचा अर्ज मा. अध्यक्ष राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग यांचेकडे सादर करण्यात आला

असता त्यांनी दिलेल्या निर्देश या कार्यालयाचे पत्र क्र. ३५०९ दि.२९.१०.२०२१ रोजी आपणांस कळविण्यात आले होते. तसेच त्याबाबत टिप्पणीची प्रत आपणांस या कार्यालयाचे पत्र क्र. २५७ दिनांक १८.०१.२०२२ रोजी देण्यात आली आहे. तसेच दिनांक २९.१०.२०२१ रोजीच्या पत्रासोबत आपण या कार्यालयास मीनऑर्डर द्वारे पाठविलेले रु.५०/- मनीऑर्डर द्वारे आपणांस परत करण्यात आले होते. सदरची मनीऑर्डर आपण न स्विकारल्यामुळे या कार्यालयात Refused असा शेरा लिहून पोस्टाद्वारे परत आली आहे. त्यानंतर सदर मनीऑर्डरबाबत माहिती मिळणेकरिता आपण दिनांक ०३.०१.२०२२ रोजी माहिती अर्ज सादर केला होता. सदर माहिती अर्जानुसार आपणांस या कार्यालयाचे पत्र क्र. २५० दि. १८.०१.२०२२ नुसार माहिती देण्यात आली व सदर पत्रासोबत रु.५०/- ची मनीऑर्डर पुनश्च परत पाठविण्यात आली व सदर पत्रात नमूद करण्यात आले की, आपण सदर रक्कम स्विकारण्यात यावी अन्यथा ती शासन खाती जमा करण्यात येईल. तथापि आपणांस दिनांक दि. १२.१०.२०२१ रोजीच्या अर्जान्वये मागणी केलेल्या नकला प्रति मा. अध्यक्ष, राज्य आयोग, मुंबई यांच्या निर्देशानुसार पुरविण्यात आल्या नसल्याने आपण या कार्यालयास पाठविलेले रक्कम रु.५०/- अदयापर्यंत या कार्यालयात जमा आहेत. सदर जमा रक्कम आपणांस पुनश्च या पत्रासोबत मनीऑर्डर द्वारे परत करण्यात येत असून सदर रु.५०/- स्विकारण्यात यावी हि विनंती जेणेकरुन आपणांस वारंवार मनीऑर्डर द्वारे रु.५०/- परत करण्यासाठी येणारा शासनाचा रक्कमेचा खर्च टाळता येईल" असे उत्तरान्वये कळविण्यात आले आहे. मात्र वरील उत्तर माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदींनुसार विसंगत असल्यामुळे मनी ऑर्डर खात्यात जमा करावी असे अपेक्षित होते. अपीलार्थी यांनी वरील पत्रात नमूद केले असून सदर माहिती दि. ११.०८.२०२२ रोजी दाखल केलेल्या प्रथम अपील अर्ज दि. २६.०८.२०२२ रोजी प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दि. ३०.०८.२०२२ रोजी आदेश पारित करुन सदर आदेशाची प्रत अपीलार्थी यांना प्रदान केली असून अपीलार्थी यांनी युक्तीवादात नमूद केले आहे. अपीलार्थी यांनी दि. १२.१०.२०२१ रोजी शिपाई श्री. गुणवंत लांडगे यांच्याविरुध्द दाखल केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने श्री. गुणवंत लांडगे यांनी दिलेल्या खुलासाची प्रत मिळण्याकरिता कार्यालयाकडे रु. ५०/- रुपये धनप्रेष (मनीऑर्डर) केले होते. तसेच अपीलार्थी यांना पत्र क्र. ३५०९ दि.२९.१०.२०२१ रोजी आपणांस कळविण्यात आले होते. तसेच त्याबाबत टिप्पणीची प्रत आपणांस या कार्यालयाचे पत्र क्र. २५७ दिनांक १८.०१.२०२२ रोजी देण्यात आली आहे. तसेच दिनांक २९.१०.२०२१ रोजीच्या पत्रासोबत आपण या कार्यालयास मीनऑर्डर द्वारे पाठविलेले रु.५०/- मनीऑर्डर द्वारे आपणांस परत करण्यात आले होते. सदरची मनीऑर्डर आपण न स्विकारल्यामुळे या कार्यालयात Refused असा शेरा लिहून पोस्टाद्वारे परत आली आहे. तसेच कार्यालयाचे पत्र क्र. २५० दि. १८.०१.२०२२ नुसार माहिती देण्यात आली व सदर पत्रासोबत रु. ५०/- ची मनीऑर्डर पुन्हा परत पाठविण्यात आली व सदर पत्रात नमूद करण्यात आले की, सदर रक्कम

स्विकारण्यात यावी अन्यथा ती शासन खाती जमा करण्यात येईल, असे अपीलार्थी यांना सूचित केले होते. त्यामुळे अपीलार्थी यांनी द्वितीय अपील अर्ज दाखल केला आहे.

सुनावणी दरम्यान विद्यमान जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक, राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, श्री. विलास मोरे व विद्यमान प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्रबंधक (विधी), राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग यांनी उपलब्ध कागदपत्रे सादर केले असून अपीलार्थी यांनी जोडपत्र-अ च्या अनुषंगाने मागणी केलेली माहिती संबंधित विहीत मुदतीत माहितीचा अधिकारी अधिनियम, २००५ च्या कलम २ (च) नुसार उपलब्ध असलेली माहिती प्रदान करण्यात आली आहे. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतल्याचे नमूद केले आहे. अपीलार्थी यांनी रु. ५०/- मनीऑर्डर रक्कम स्विकारण्यास वारंवार नकार दिला आहे असे नमूद केले आहे. यासंदर्भात स्वत: उपलब्ध रक्कमेचे चलन स्टेट बॅक ऑफ इंडिया मध्ये भरण्यात आले असून उपरोक्त चलनाची प्रत, उत्तराची प्रत, महाराष्ट्र कोषगार नियम, १९६८ ची प्रत सोबत जोडून अपीलार्थीस पाठविण्यात आली आहे. प्रस्तुत प्रकरणी विद्यमान जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक, राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग यांनी अपीलार्थी यांना यापूर्वी दिलेल्या चलनाची प्रत, उत्तराची प्रत, महाराष्ट्र कोषगार नियम, १९६८ च्या छायांकित प्रती त्यांच्या भ्रमणध्वनी व ई-मेल वर विनामुल्या तात्काळ प्रदान करावी. या निर्देशासह सदर द्वितीय अपील अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

**आदेश**

**१. वरील विवेचनानुसार जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही करावी.**

**२. अपिल निकाली काढण्यात येत आहे.**

**( राहुल भा. पांडे )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : १८.०९.२०२५**

State Information Commission ★ Maharashtra ★